# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 04 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राष्ट्रपतींचं अभिभाषण हे विकसित भारताच्या संकल्पाला बळ देणारं असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन करणार नाही–केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची लोकसभेत स्पष्टोक्ती
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या बीड दौऱ्यावर–विविध कामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण
- ‘मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचं शंभर दिवसांचं निर्धारित उद्दीष्ट साठ दिवसांत पूर्ण

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये १५ सुवर्ण पदकं जिंकत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी कायम

****

राष्ट्रपतींचं अभिभाषण हे विकासित भारताच्या संकल्पाला बळ देणारं असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर झालेल्या चर्चेत बोलत होते. देशभरातून २५ कोटी लोक गरीबीतून बाहेर आल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. ते म्हणाले –

> ***आदरणीय राष्ट्रपतीजी का ये उद्‌बोधन विकसित भारत के संकल्प को मजबुती देनेवाला है। नया विश्वास पैदा करनेवाला है। और जनसामान्य को प्रेरीत करनेवाला है। सारे अध्यन बार बार ये कह चुके है, की गत दस वर्षों में देश की जनता ने हमें सेवा करने का मौका दिया है। पांच पांच दसक तक गरीबी हटाओ के नारे सुने है। और अब पच्चीस करोड***

***गरीब गरीबी को परास्त करके बाहर निकले है। योजनाबद्ध तरीके से समर्पित भाव से अपनेपन की पुरी संवेदनशीलता के साथ जब गरीबों के लिये जीवन खपाते है तब ये होता है।***

सरकारी योजनांचा लाभ घेत असलेल्या १० कोटी बनावट लाभार्थ्यांची नावं हटवून खऱ्या आणि पात्र लाभार्थ्यांना सरकारी योजनेचा लाभ दिल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. शासकीय खरेदीतही जेम पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक व्यवहार केले जात असून, यामुळे एक लाख १५ हजार कोटी रुपयांची बचत झाल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली. शासकीय कार्यालयांच्या स्वच्छता मोहिमेतून भंगार विक्रीतून दोन हजार ३०० कोटी रुपये प्राप्त झाल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

राज्यसभेत आजही धन्यवाद प्रस्तावावर चर्चा पुढे सुरू राहिली. भाजपचे बन्सीलाल गुर्जर, काँग्रेसच्या रेणुका चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल, बीजू जनता दलाचे मानस रंजन मंगराज, तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष आदी सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

****

देशात गेल्या दशकभरात मोबाईल उत्पादन क्षेत्रात तीनशेहून अधिक कंपन्या कार्यरत झाल्या असून, १२ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरून ही माहिती दिली. ही बाब देशाच्या आत्मनिर्भरतेला पोषक असल्याचं, वैष्णव यांनी म्हटलं आहे.

****

कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही, तसंच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जर भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी केली जाईल, आणि दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत दिलं. महाराष्ट्रात पिकविमा योजनेत गेल्या सरकारच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचं वक्तव्य राज्याचे कृषी मंत्री शिवाजीराव कोकाटे आणि भाजपा आमदार सुरेश धस यांनी केल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत सांगितलं. याबाबत सुळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना

चौहान बोलत होते. महाराष्ट्र सरकारनं पिकविमा योजनेच्या सुधारणेसाठी पावलं उचलली आहेत, असंही चौहान यांनी सांगितलं.

****

मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांना राज्यमंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलेल्या आरोपांच्या आधारे तत्कालिन कृषीमंत्र्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी दानवे यांनी केली. ते म्हणाले –

> ***शेतकऱ्यांच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. या राज्य सरकारने ताबडतोब धनंजय मुंडेचा राजीनामा घेतला पाहिजे. नाहीतर येणाऱ्या काळात अधिवेशन हे अधिवेशन धनंजय मुंडेच्या राजीनाम्याशिवाय मला वाटत नाही पुढे जाईल. सरकारने पुढाकार घेऊन या खात्याच्या मंत्र्यावर, आणि या राज्याच्या तत्कालीन सचिवावर सुद्धा गुन्हा दाखल केला पाहिजे अशा प्रकारची मागणी आपल्या माध्यमातून मी सरकारकडे करतो.***

दरम्यान, धनंजय मुंडे यांनी मात्र आज पत्रकार परिषद घेऊन अंजली दमानिया यांनी केलेले आरोप फेटाळून लावले आहेत. सर्व निर्णय हे नियमानुसारच घेण्यात आल्याचं मुंडे यांनी स्पष्ट केलं.

> ***सनसनाटीखेज आरोप करायचे, धादांत खोटे आरोप करायचे आणि स्वतःची प्रसिद्धी आणि दुसऱ्याला बदनाम करायचं याच्या पलिकडे यातही मला दुसरं काही आणखीनही आढळून येत नाही. कोणतीही बाब डीबीटी मधून वगळण्याची अथवा समाविष्ट करण्याचे संपूर्ण अधिकार हे नियमातील तरतुदीनुसार माननीय मंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्या आणि या प्रक्रियेमध्ये सुद्धा याच कार्यपद्धतीचा अवलंब केलेला आहे. आणि माननीय उपमुख्यमंत्री वित्त व माननीय मुख्यमंत्र्यांच्या ही बाब सादर करून त्यांच्या पूर्व मान्यतेने ही प्रक्रिया अंतिम केलेली आहे.***

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्ह्यातल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन, खुंटेफळ साठवण तलाव जलवाहिनी कामाचा शुभारंभ तसंच आष्टी इथल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ मंदिर समाधी दर्शन आणि समाधी बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. तसंच जागतिक खो-खो स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा सत्कारही यावेळी फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

****

शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस एक वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक तसंच औद्योगिक प्रयोजनासाठी आणि सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या जमिनींच्या बाबत हा निर्णय लागू होईल.

सातारा जिल्ह्यातल्या कोयना जलाशयात बुडीत बंधारे बांधण्याच्या २५ प्रकल्पांसाठी १७० कोटी रूपये, पुणे जिल्ह्यातल्या टेमघर प्रकल्पाच्या दुरूस्तीसाठी ३१५ कोटी ५ लाख रूपयांच्या खर्चालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

अवैध मद्य विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या जवानांसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कायमस्वरुपी धोरण निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी सांगितलं. नाशिक इथले जवान कैलास गेणू कसबे यांचा मद्यविरोधी कारावाईदरम्यान मृत्यू झाला त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून साडेसात लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजने'त शंभर दिवसांत दीड लाख पंप बसवण्याचं उद्दीष्ट निर्धारित केलं होतं, हे उद्दीष्ट महावितरणने साठ दिवसात पूर्ण केलं आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ही माहिती दिली. सहा डिसेंबरपर्यंत राज्यात ९७ हजार २९५ सौर कृषी पंप बसवण्यात आले होते. पुढच्या दोन महिन्यात ४ फेब्रुवारीपर्यंत महावितरणने आणखी ५३ हजार नऊ सौर कृषी पंप

बसवले. त्यामुळे मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत आतापर्यंत बसवलेल्या पंपांची संख्या एक लाख ५० हजार ३०४ झाली आहे. यामध्ये जालना जिल्ह्यात सर्वाधिक १८ हजार ४९४ पंप बसवण्यात आले असून, बीड जिल्ह्यात त्या खालोखाल १७ हजार ९४४, अहिल्यानगर १३ हजार ३६६, परभणी ११ हजार ७५५, छत्रपती संभाजीनगर नऊ हजार ३२९, हिंगोली आठ हजार ५३८, आणि धाराशीव जिल्ह्यात सहा हजार ७६५ सौर पंप बसवण्यात आल्याची माहिती महावितरणने दिली.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये आज झालेल्या महिला एकेरी बॅडमिंटनच्या अंतिम सामन्यात हरियाणाच्या अनमोल खरबने विजेतेपद जिंकले आहे. अंतिम सामन्यात अनमोलने अनुपमा उपाध्यायचा २१-१६, २२-२० असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. नेमबाजी स्पर्धेत १५ वर्षीय नेमबाज जोनाथन अँथनी याने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सरबज्योत सिंग याचा पराभव करत सुवर्णपदक जिंकले.

महाराष्ट्राने सर्वाधिक ६१ पदकांची कमाई केली आहे. त्यात १५ सुवर्ण, २६ रौप्य आणि २० कास्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्राचं तिसरं स्थान कायम असून पहिल्या स्थानावर कर्नाटक तर दुसऱ्या स्थानावर सेना दलांचा समावेश आहे. तसंच, मणिपूर, मध्य प्रदेश, तामिळनाडू, दिल्ली, हरयाणा आणि पंजाब यांचा पहिल्या दहा संघांत समावेश आहे.

****

बीड जिल्ह्यात आज ज्ञानराधा मल्टीस्टेट शाखेतील ठेवीदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. ठेवीदारांचे अर्ज ऑफलाईन स्वीकारले जावेत तसेच ठेवीदाराच्या ठेवी लवकरात लवकर परत द्याव्यात, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचं ठेवीदार कृती समितीचे प्रमुख संदीप उबाळे यांनी सांगितलं.

****

जालना-राजूर रस्त्यावर बावणेपांगरी फाट्याजवळ मध्यरात्री भरधाव ट्रक आणि दुचाकी यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. मृतांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश आहे.

****